दैनिक
# श्रमिक लोकराज्य
नांदेड,परभणी,लातूर,हिंगोली येथे वितरीत होणारे वृतपत्र

संपादक
ज्ञानेश्वर बालाजीराव डोईजड
मो.7875782377

कार्यकारी संपादक
वैजनाथ द.स्वामी
मो.8329736330

उपसंपादक
दत्ता पा.माळेगावे गोजेगावकर
मो.9766761475

नांदेड । दैनिक । वर्ष ५ । अंक २० । शुक्रवार, दि.०५ सप्टेंबर २०२५ । RNI MAHMAR/2021/85782 । पाने ०४ । किंमत २ रूपये । ई-पेपर : www.shramiklokrajya.in

# महाराष्ट्रात रात्रभर मुसळधार पाऊस

**मुंबई:** मुंबईसह कोकण किनारपट्टी व घाटमाथा भागात काल रात्रीपासून मुसळधार पाऊस पडत आहे.ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांसह सातारा, कोल्हापूर, पुणे या भागांमध्ये मुसळधार पावसाचा जोर कायम आहे. राज्यात अनेक भागातील शेतात पुन्हा पाणी भरले आहे.यामुळे शेतीतील पिके सडायला लागली आहे.यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे.शेतकरी शासनाच्या मदतीची वाट पाहत आहे.

मुंबईची स्थिती!

राजधानी मुंबईत संपूर्ण रात्र पावसाने



दमछाक केली. दादर, सायन, अंधेरी, कुर्ला, चेंबूर या भागात रस्ते पाण्याखाली गेले असून लोकल ट्रेन वेळापत्रक विस्कळीत झाले आहे. अनेक ठिकाणी BEST बस मार्ग बदलण्यात आले आहेत. रात्रभर झालेल्या पावसामुळे सकाळच्या ऑफिस व शाळा-कॉलेज प्रवासात नागरिकांना प्रचंड अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

कोकणात पाणीपातळी वाढली!

कोकण किनारपट्टीवर झालेल्या जोरदार पावसामुळे नद्या-नाल्यांना पूर आला आहे. महाड, पोलादपूर, चिपळूण, दापोली भागात पाणी मोठ्या प्रमाणात साचले असून अनेक घरांना पाणी शिरले आहे. कोकण रेल्वेच्या काही भागांतही पावसामुळे धावपळ निर्माण झाली आहे.

घाटमाथ्यावर मुसळधार पाऊस!

सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील घाटमाथ्यावर अतिवृष्टी झाली आहे. वारणा, पंचगंगा व कृष्णा नदीच्या पाणीपातळीत झपाट्याने वाढ होत असून प्रशासनाने निचांकी भागातील नागरिकांना सतर्कतेचा इशारा दिला आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील काही बंधाऱ्यांचे दरवाजे उघडण्यात आले आहेत.

प्रशासन सतर्क!

राज्य आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडून सांगण्यात आले आहे की, पुढील २४ ते ४८ तासांत पावसाचा जोर कायम राहणार आहे. निचांकी भागातील नागरिकांनी सावधगिरी बाळगावी तसेच गरज असल्यास सुरक्षित स्थळी स्थलांतर करावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. एनडीआरएफच्या पथकांना सज्ज ठेवण्यात आले आहे.

विदर्भाची स्थिती!

विदर्भात गेल्या तीन दिवसांपासून पाऊस सुरूच आहे.यामुळे अनेक नदी नाल्यांना पूर आले आहे.तर शेतात पाण्याचे तळे साचले आहे.

## हदगाव येथे सकल ओबीसी समाजाकडून मराठा आरक्षणाच्या जी आर चा निषेध

### तहसीलदार मार्फत मुख्यमंत्र्यांना निवेदन



**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**हदगाव -** महाराष्ट्र सरकारने हैदराबाद गॅझेटद्वारे मराठा समाजाला आरक्षण देण्याचा जीआर 2 सप्टेंबर रोजी काढण्यात आला. या जीआर विरोधात ओबीसी समाज आक्रमक झाला असून ठीक ठिकाणी जीआर ची होळी करून निषेध व्यक्त करीत आहेत. आज ४ रोजी सकल ओबीसी समाजाच्या वतीने हदगाव तहसीलदार सुरेखा नांदे यांच्यामार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन देण्यात आले यावेळी सकल शेकडो ओबीसी समाज उपस्थित होता. मुंबई येथे आझाद मैदानावर मराठा युद्ध म्हणून जरांगे पाटील यांनी सतत पाच दिवस सुरू केलेल्या आंदोलनास राज्य शासन नमले असून मराठा समाजाला ओबीसी समाजासारखे आरक्षण मिळेल असा हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा जीआर काढला असल्यामुळे या निर्णयानुसार मराठा समाजातील सर्व व्यक्तींना मराठा कुणबी समाजाशी जोडून ओबीसी प्रमाणपत्र मिळवून देण्याचा मार्ग मोकळा करण्यात आला आहे. हा शासन निर्णय पूर्णपणे अन्यायकारक. बेकायदेशीर. असंविधानिक आहे या शासन निर्णयामुळे ओबीसी समाजातील ४०० हून अधिक जातीच्या हक्कावर गदा येणार असून त्यांना शिक्षण नोकरीच्या क्षेत्रात होणारे प्रतिनिधित्व गंभीर स्वरूपामध्ये घटणार आहेत म्हणून हा जीआर राज्य सरकारने त्वरित रद्द करावा अशी मागणी हादगाव तालुक्यातील शेकडो ओबीसी बांधवांनी तहसीलदार यांच्यामार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे.

## नवीन जीएसटी दर 22 सप्टेंबरपासून होणार लागू

### , आता 5% आणि 18% स्लॅब, 90 टक्के वस्तू होतील स्वस्त

**नवी दिल्ली.** जीएसटी परिषदेच्या बैठकीत मंत्र्यांच्या गटाचे सर्व प्रस्ताव स्वीकारण्यात आले आहेत. यासह, आता जीएसटीमध्ये फक्त 5 आणि 18% असे दोन स्लॅब असतील. विशेष म्हणजे नवीन जीएसटी दर 22 सप्टेंबरपासून लागू होतील. जीएसटी परिषदेच्या बैठकीनंतर अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, सर्व राज्यांनी जीएसटी दर तर्कसंगत करण्यावर सहमती दर्शविली आहे. बहुतेक दैनंदिन वस्तूंवरील जीएसटी दर कमी करण्यात आले आहेत. जीएसटी परिषदेच्या बैठकीनंतर झालेल्या घोषणांवर पंतप्रधान मोदींनी आनंद व्यक्त केला आहे. केंद्राच्या सर्व जीएसटी प्रस्तावांना परिषदेने मान्यता दिल्याबद्दल त्यांना आनंद आहे, असे ते म्हणाले.



350 सीसीपेक्षा कमी क्षमतेच्या बाइक्सवर जीएसटी दर 18% असेल, तर मध्यम आकाराच्या कारवर जीएसटी दर 40% असेल.

अर्थमंत्री निर्मला सीतारमण म्हणाल्या की, केसांचे तेल, साबण, बार, टूथपेस्ट, सायकली, टेबलावर घालण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या वस्तूंवर आता 5 टक्के जीएसटी लागेल, तर यूएचटी दूध आणि ब्रेडवरील जीएसटी दर शून्य असेल.

पान, मसाला, सिगारेट आणि इतर चमकदार उत्पादनांवर 40 टक्के जीएसटी आकारला जाईल असे सरकारने सांगितले. याशिवाय, लक्झरी उत्पादनांवरही 40 टक्के

ही उत्पादने 5% आणि 18% जीएसटीच्या कक्षेत येतील.

एसी आणि टीव्ही सारख्या इलेक्ट्रिक उत्पादनांवर 18% जीएसटी आकारला जाईल. सुकामेवा, लोणचे, कॉर्न फ्लेक्स, साखर आणि साखरेचे क्यूब्स यासारख्या अनेक वस्तूंवर 5% जीएसटी आकारला जाईल. याशिवाय, सिमेंटवर 28% ऐवजी 18% जीएसटी लागू होईल. 1200 सीसीपेक्षा कमी क्षमतेच्या कार आणि

जीएसटी असेल. यासोबतच, केंद्राने घेतलेले संपूर्ण कर्ज फेडले जाईपर्यंत तंबाखू आणि तंबाखूशी संबंधित उत्पादनांवर भरपाई उपकर सुरू राहील. त्यानंतर हा उपकर रद्द केला जाईल: सरकार याशिवाय, कॅफिनेटेड पेये आणि कार्बोनेटेड पेये देखील 40% च्या कक्षेत येतील.

ग्राहकांना कर कपातीचा लाभ मिळेल

जीएसटी परिषदेच्या बैठकीनंतर पत्रकार परिषदेत महसूल सचिवांनी सांगितले की, उद्योगांनी यापूर्वीही व्याजदर कपातीचे फायदे मोठ्या प्रमाणात दिले आहेत. आम्हाला आशा आहे की यावेळीही उद्योग अखेर ग्राहकांना फायदे देईल. अर्थमंत्री निर्मला सीतारमण म्हणाल्या की, टॅरिफ गोंधळाचा जीएसटी सुधारणांवर कोणताही परिणाम झाला नाही. आम्ही दीड वर्षांहून अधिक काळ यावर काम करत आहोत.



**वाढदिवसाच्या शुभेच्छा..!**

नांदेड भाजपचे नेते प्रवीण साले यांच्या वाढदिवसानिमित्त दैनिक श्रमिक लोकराज्य च्या अंकात त्यांच्या कार्याविषयी लेख प्रकाशित करण्यात आला होता.

या लेखाची प्रत त्यांना वाढदिवसानिमित्ताने भेट देऊन शुभेच्छा देताना दैनिक श्रमिक लोकराज्यचे नांदेड प्रतिनिधी कृष्णा मठपती.

## जीआरचा ओबीसीवर परिणाम होणार नाही

**रायगड:** मराठा आरक्षण जीआरचा ओबीसी आरक्षणावर कोणताही परिणाम होणार नाही. मराठ्यांना आणि ओबीसींना त्याच्या हक्काचे आरक्षण



मिळेल. आम्ही जे राजकारण शिकलो त्यामध्ये सर्वांना सोबत घेऊन पुढे जाणे हेच ब्रीद आहे. कधीही दोन समाज एकमेकांसमोर आणणार नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. गुरूवारी ते रायगड येथे माध्यमांशी बोलत होते.

मराठा समाज महाराष्ट्राच्या जडणघडणेतील महत्वाचा

यावेळी मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, ओबीसीवर अन्याय होऊ शकत नाही. ओबीसी आरक्षण काढून दुसऱ्याला देणार नाही. मराठा समाज महाराष्ट्राच्या जडणघडणेतील महत्वाचा समाज आहे. त्यांच कल्याण झाले पाहिजे. त्याजबरोबर १८ पगड जातीवरही अन्याय होणार नाही, हीच आमची भावना आहे, असे फडणवीस म्हणाले.

मराठा आरक्षण आंदोलनादरम्यान दाखल गुन्ह्यांवर बोलताना फडणवीस यांनी सांगितले की, "आताचे गुन्हे उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार दाखल झाले आहेत. त्यावर निर्णय उच्च न्यायालयाच्या निदर्शनास आणूनच घ्यावा लागणार आहे."

"सर्व मराठ्यांना ओबीसीमध्ये टाका, ही मागणी स्विकारलेली नाही. ज्यांकडे अधिकृत पुरावे आहेत, त्यांनाज ओबीसीमध्ये घेतलं जाईल. राष्ट्रीय ओबीसी महासंघाने मराठा आरक्षण जीआरचा अभ्यास केला आहे. या जीआरचा ओबीसीवर कोणताही परिणाम होणार नाही, असं स्पष्ट केल आहे. भूजबळ यांच्याशी बोलण झालं आहे. त्यांच्या मनातीलही शंका दूर करू," असे फडणवीस यांनी सांगितले.

## शेतातून फुलांची चोरी; शेतकऱ्याला लाख रुपयांचा फटका

**नारायणगाव:** ऐन गणेशोत्सवाच्या काळात फुलांची मोठी मागणी असून, बाजारभावदेखील वाढलेले आहेत. असे असताना जुन्नर तालुक्यातील निमदरीचे शेतकरी गोविंद सदाशिव भगत हे निमगाव तर्फे महाळुंगे येथे करत असलेल्या खंडाच्या शेतातून रात्रीच्या वेळी



चोरट्यांनी सुमारे 500 किलो शेवंतीची फुले चोरून नेली. या प्रकारामुळे शेतकऱ्याचे एक लाख रुपयांहून अधिक नुकसान झाले आहे. गोविंद भगत हे दुसऱ्याच्या जमिनीवर खंडाने शेती करून उपजीविका चालवतात. यंदा गणेशोत्सवाच्या बाजारपेठेत चांगला भाव मिळेल या अपेक्षेने त्यांनी एक एकरावर सफेद शेवंतीची लागवड केली होती.

# देगाव येथे श्री गुरु संत आनंदबन महाराजांच्या सातव्या पुण्यस्मरण सोहळ्याचा भव्यदिव्य जागर!

### खासदार रवींद्र चव्हाण यांच्यासह अनेक साधुसंत उपस्थित

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**नायगाव -** आध्यात्मिक वारसा जपणाऱ्या नायगाव तालुक्यातील देगाव येथे आज, गुरुवार, ७ सप्टेंबर रोजी श्री गुरु संत मंगल बन गुरु आनंदबन महाराजांच्या सातव्या पुण्यस्मरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यासाठी खासदार रवींद्र चव्हाण यांच्यासह जिल्ह्यातील अनेक दिग्गज साधुसंत, महंथ आणि हजारो शिष्यगण, तसेच पत्रकार बळवंत मोरे, संतोष कदम वाडेकर, साहेबराव मोरे, सुभाष मोरे, रावसाहेब पाटील मोरे, रामदास पाटील मोरे व गावातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते. श्री बालयोगी गंगाबन गुरु मंगलम महाराज मठ संस्थान, देगाव यांनी या



सोहळ्याचे अत्यंत भव्यदिव्य आणि अभ्यासपूर्ण नियोजन केले होते.

या सोहळ्याची सुरुवात सकाळी ९:०० वाजता समाधी पूजा आणि अभिषेकने झाली. त्यानंतर कोलंबी येथील श्री गुरु महंत, कहाळा येथील श्री गुरुवर्य देवगिरी महाराज आणि माहूर येथील श्री गुरु संत नारायण गिरी महाराज मठ संस्थान वडगुंफा येथील महंतांनी उपस्थित राहून सोहळ्याची शोभा वाढवली.

या पुण्यस्मरण सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात 'श्रमिक लोकराज्य'च्या प्रतिनिधीशी बोलताना खासदार रवींद्र चव्हाण यांनी, "हे पुण्यस्मरण सोहळे केवळ धार्मिक कार्यक्रम नसून, ते गुरुंच्या विचारांचा, मानवतेचा आणि एकजुटीचा संदेश देणारे पवित्र क्षण आहेत," असे सांगितले. त्यांनी गुरुंच्या कार्याचा गौरव करत उपस्थित भाविकांचे मार्गदर्शन केले.

या सोहळ्याचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे, उपस्थित सर्व भाविकांसाठी महाप्रसादाची सुयोग्य व्यवस्था करण्यात आली होती. त्यानंतर रात्री ९ वाजता 'आनंद दत्त महापूजा' आयोजित करण्यात आली, ज्यात हजारो भाविकांनी सामूहिक आरती आणि महाप्रसादाचा लाभ घेतला. हा सोहळा अत्यंत शांत आणि आध्यात्मिक वातावरणात पार पडला, ज्यामुळे उपस्थित भाविकांना एक अलौकिक अनुभव मिळाला.

# माहूर पोलिसांचे पथसंचलन

## सण उत्सवांच्या पार्श्वभूमीवर भर पावसात शहरात पोलिस पथसंचलन

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**
**श्रीक्षेत्र माहूर तालुका प्रतिनिधी**

प्रामुख्याने श्री गणेशोत्सव तसेच ईद मिलादुन्नबी या देश पातळीवर साजरा होणाऱ्या सण उत्सवांच्या पार्श्वभूमीवर माहूर पोलिसांनी शहरातील मिरवणूक मार्गावरून भर पावसात पथ संचलन केल्याने नागरिकांतून पोलिसांचे अभिनंदन होत असून गणेशोत्सव शांततेत डीजे मुक्त सदभावना धार्मिक सलोखा राखत साजरा करावा असे आवाहन पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी यावेळी केले आहे

विशेष म्हणजे माहूर शहरात 19 ठिकाणी श्री गणेशाची स्थापना करण्यात आली असून तालुक्यात दीडशेवर श्री गणेश मंडळांनी मोठ्या भक्ती भावात श्री गणेशाची स्थापना करून या ठिकाणी विविध कार्यक्रमासह धार्मिक कार्यक्रम तसेच अनेक



ठिकाणी रक्तदान शिबिरही घेण्यात आलेली आहेत श्री गणेशाची स्थापना केल्यानंतर दररोजच पाऊस पडत असून अनेक ठिकाणी धार्मिक सामाजिक कार्यक्रमात पावसाचे विघ्न येत असले तरीही गणेशभक्त मोठ्या भक्ती भावाने श्री गणेशाची पूजाअर्चा सह धार्मिक कार्यक्रम घेतच आहेत भर पावसात श्री गणेशाची स्थापना असलेल्या ठिकाणी कुठलेही व्यत्यय येऊ नये म्हणून पोलीस निरीक्षक गणेश कराड हे स्वतः या ठिकाणी भेटी देत आहेत

विशेष तालुक्यात शांतता राहावी यासाठी पोलीस निरीक्षक गणेश कराड हे रात्र दिवस पोलीस स्टेशन हद्दीतील सर्वच गणेश मंडळांना भेटी देत आहेत या पार्श्वभूमीवर माहूर शहरातून दि 4 रोजी 4 वाजता पथ संचलन करण्यात आले यावेळी पाऊस भरपूर पडला तरीही पोलिसांनी पथसंचलन चालू ठेवले संचलन भर पावसात सुरू असल्याने नागरिकांनी पोलिसांच्या कर्तव्यप्रती आदर व्यक्त करून त्यांचे अभिनंदन केले यावेळी पोलीस निरीक्षक गणेश कराड सपोनी शरद घोडके सपोउपनी पालसिंग ब्राह्मण सपोउपनी गणेशअन्येबोईनवाड सपोउपनी बाबू जाधव यांचे सह पोलीस होमगार्ड मोठ्या संख्येने उपस्थित होते

## कंधार येथे समाजशास्त्र पदव्युत्तर विद्यार्थी उदबोधन कार्यक्रम संपन्न




**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**नांदेड -** श्री.शिवाजी मोफत एज्युकेशन सोसायटी संचलित, श्री. शिवाजी कॉलेज कंधार येथे पदव्युतर स्तरावरील समाजशास्त्र प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांकरिता उद्बोधन शिबिर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. एस. एम. जोगदंड यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. विजया साखरे. प्रोफेसर डॉ. डी. एस. सावंत आणि डॉ. डी. डी. पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.

सदरील कार्यक्रमात एम ए. समाजशास्त्र प्रथम व द्वितीय वर्षातील विद्यार्थ्यांचा प्रमुख मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला डॉ. माधव शिंदे. डॉ. सुभाष रगडे डॉ. ज्ञानेश्वर शिंदे प्रा. गावंडे डॉ. परीक्षेत धोंडगे डॉ. प्रवीण पवार डॉ. व्ही. टी. ठाकूर डॉ. उमेश पुजारी. डॉ. एस. पी. गुट्टे.डॉ. भागानगरे डॉ.शी. एन. हनुमंते,डॉ. कृष्णा आगे, डॉ. एम. आर. कदम भागवत जाधव यांची विशेष उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाचे सुंदर व कौशल्यपूर्ण सूत्रसंचालन डॉ. पांडुरंग पांचाळ यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. राजेंद्र वाघमारे यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सतीश शिंदे,व्यवहारे कृष्णा, यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## डॉ. संदीप ढगे वजीरगांवकर यांना राज्यस्तरीय आरोग्यरत्न नागरी पुरस्कार जाहीर

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

मुखेड :
मुखेड येथील दंत व मुखरोग तज्ञ डॉ. संदीप बळीराम ढगे वजीरगांवकर यांची दंतआरोग्य क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन राज्यस्तरीय आरोग्यरत्न नागरी



पुरस्कार २०२५ साठी निवड झाली आहे.
हा पुरस्कार महात्मा ज्योतीराव फुले शिक्षक परिषद, जिल्हा नांदेड यांच्या वतीने प्रदान करण्यात येत असून, पुरस्कार प्रदान सोहळ्याचे आयोजन दि. ५ सप्टेंबर २०२५, शुक्रवार सकाळी ११ वाजता कुसुम सभागृह, नांदेड येथे करण्यात आले आहे.
डॉ. ढगे यांनी आजपर्यंत ग्रामीण भागात दंतआरोग्याबाबत जनजागृती, रुग्णांना आधुनिक उपचारसुविधा उपलब्ध करून देणे तसेच समाजहिताचे अनेक उपक्रम राबविले आहेत. त्यांच्या या योगदानामुळेच त्यांना हा सन्मान मिळाल्याचे आयोजकांनी सांगितले.या निवडीबद्दल विविध क्षेत्रांतून डॉ. ढगे यांचे अभिनंदन होत आहे.

## नांदेड महानगर मराठी पत्रकार संघाची नवीन कार्यकारिणी जाहीर

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**नांदेड -** मुंबई मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख यांच्या आदेशावरून नांदेड महानगर मराठी पत्रकार संघाची सन २०२५- २६ ची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे.



मुंबई मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम. देशमुख यांच्या आदेशावरून सरचिटणीस प्रा. सुरेश नाईकवाडे यांनी बुधवार दि.३ सप्टेंबर रोजी
नांदेड महानगर मराठी पत्रकार संघाची नवीन कार्यकारिणी जाहीर केली असून महानगराध्यक्षपदी रविंद्र संगनवार तर कार्याध्यक्षपदी गजानन कानडे यांची निवड करण्यात आली आहे.
तसेच उर्वरित कार्यकारिणी पुढीलप्रमाणे आहे.
उपाध्यक्ष - किरण कुलकर्णी, उपाध्यक्ष - प्रशांत गवळे, उपाध्यक्ष - आनंद कुलकर्णी, उपाध्यक्ष -
सुरेश काशीदे, महानगर सरचिटणीस - सुनिल पारडे, कोषाध्यक्ष - मारुती सवंडकर, संघटक - प्रल्हाद लोहेकर, समन्वयक - स.रविंद्रसिंघ मोदी,महानगर सहसचिव - कंथक सूर्यतळ, सहसचिव - मिर्झा आझम बेग मेहमूद बेग, प्रसिध्दी प्रमुख - माधव गोधणे, प्रसिद्धी प्रमुख - नरेश तुप्तेवार अशी निवड करण्यात आली आहे .
दरम्यान, मराठी पत्रकार परिषदेचे राज्य उपाध्यक्ष प्रकाश कांबळे, माजी कोषाध्यक्ष तथा पत्रकार अधिस्वीकृती समितीचे विभागीय अध्यक्ष विजय जोशी, माजी सरचिटणीस चारुदत्त चौधरी, पत्रकार हल्ला विरोधी कृती समितीचे जिल्हा संघटक ॲड. प्रदीप नागापूरकर, नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष गोवर्धन बियाणी, नांदेड जिल्हा मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संतोष पांडागळे, कार्याध्यक्ष अनिल कसबे, सरचिटणीस अनुराग पोवळे आदींनी या नूतन कार्यकारिणीच्या सर्व नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन करून पुढील यशस्वी कार्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत.

## उंद्री प.दे. परिसरात विक्रमी पावसामुळे शेतीपिकांचे मोठे नुकसान

### पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याची मागणी

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**मुखेड -** मुखेड तालुक्यातील उंद्री प.दे येथे दि. २७ व २८ ऑगस्ट रोजी अनुक्रमे ५६.८ मिमी व १२५.५ मिमी एवढा विक्रमी पाऊस झाला. या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, नाल्याशेजारील शेतजमिनीतील गाळ व माती वाहून गेल्याने अनेक शेतजमिनी भविष्यात लागवडीयोग्य राहणार नाहीत. त्यामुळे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.



यासोबतच जाहुर–देगलुर मुख्य रस्त्यावरील नवी आबादी व सार्वजनिक स्मशानभूमीजवळील दोन्ही पुलांचे नवीन बांधकाम करावे तसेच पाझरतलाव–चोंडी शिव व बेंडकी तांडा–मुख्य नाला या दरम्यान मुख्य नाल्याचे रुंदीकरण व खोलीकरण करण्यात यावे, अशी मागणीही करण्यात आली. या मागण्यांचे निवेदन नायब तहसीलदार यांना देण्यात आले. यावेळी मारोती पाटील मटके (ता. कॉंग्रेस सचिव), शिवाजीराव पंदनवाड (मा.सरपंच प्र.), ज्ञानेश्वर पाटील उंद्रीकर, हणमंत पा. वडजे, प्रभाकर देशाई पवार, गणेश देशाई पवार, हणमंत देशाई पवार, माधव देशाई पवार आदी मान्यवर उपस्थित होते.

## शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय रुग्णालय व रसशाळा, नांदेड येथे रुग्णसेवेसोबत सुरक्षा रक्षकांची सेवाभावी भूमिका

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**पवन पाटोळे / नांदेड :** प्राचीन काळापासून ऋषीमुनींनी सांगितल्याप्रमाणे आयुर्वेदिक उपचार हा मानवासाठी अतिशय उपयुक्त आहे. आज त्याच परंपरेला पुढे नेत शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय रुग्णालय व रसशाळा, नांदेड येथे उत्कृष्ट उपचार व सुविधा उपलब्ध करून दिल्या जात आहेत. या रुग्णालयात केवळ नांदेडच नव्हे तर संपूर्ण जिल्ह्यातून रुग्ण मोठ्या संख्येने उपचारासाठी येत आहेत. ओ डेंटल विभागातील डॉक्टर प्रतिभाताई वाघमारे मॅडम पेशंटला अतिशय चांगली वागणूक व अतिशय चांगला उपचार करतात असे पेशंट सांगत आहेत

या ठिकाणी रुग्णांसाठी वैद्यकीय सेवेसोबतच सुरक्षारक्षक हे आपली सेवाभावी भूमिका पार पाडताना दिसून येतात. रुग्णालय परिसरात टू-व्हीलर पार्किंगची योग्य व्यवस्था राखणे, पार्किंगवर लक्ष ठेवणे, तसेच वृद्ध रुग्ण व नातेवाईकांना हात धरून मदत करणे, अशा विविध जबाबदाऱ्या ते मनापासून निभावत आहेत.

सुरक्षारक्षकांच्या या कार्यामुळे रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांमध्ये समाधानाची भावना निर्माण झाली असून, जनतेकडून त्यांचे कौतुक व अभिनंदन केले जात आहे.

## आंबुलगा येथील ओबीसी समाजाचे जोरदार आंदोलन

**श्रमिक लोकराज्य नेटवर्क**

**मुखेड :** ओबीसी समाजाच्या न्यायहक्कांवर गदा आणणाऱ्या शासन निर्णयाच्या विरोधात मुखेड तालुक्यातील मौजे आंबुलगा येथील ओबीसी समाजाच्या वतीने मुखेड तहसील कार्यालयासमोर जोरदार आंदोलन करण्यात आले. यावेळी तहसिलदार मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले.
सरकारने मराठा आरक्षणाच्या संदर्भात काढलेल्या जी.आर. मुळे ओबीसी समाजावर अन्याय होत असल्याचा ठपका आंदोलनकर्त्यांनी ठेवला.
विशेषतः हैदराबाद गॅझेट ओबीसीमध्ये समाविष्ट केल्याने स्थानिक ओबीसी समाजाच्या मागण्यांकडे दुर्लक्ष झाले आहे, असा सूर आंदोलनातून उमटला.
आंदोलनादरम्यान शासनाविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. ओबीसी समाजाचा हक्क हिरावून घेणाऱ्या कोणत्याही निर्णयाला तीव्र विरोध केला जाईल, असा इशारा देण्यात आला.
तसेच शासनाने तातडीने यावर स्पष्ट भूमिका घेतली नाही तर पुढील काळात आंदोलन आणखी तीव्र करण्यात येईल, असे आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट केले.
दरम्यान, ओबीसी समाजातील अनेक जाती अजूनही आपल्या अस्तित्वासाठी झगडत आहेत. शिक्षण, सुविधा व निवाऱ्याच्या मूलभूत गरजांपासून समाज वंचित आहे. पालीतील झोपडीतली घरे आजही पक्की झालेली नाहीत, अशी खंत व्यक्त करण्यात आली. सरकारने नेहमीच ओबीसींच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्याचा आरोपही यावेळी झाला.या आंदोलनाला ओबीसी समाजातील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.



हे वृत्तपत्र, मालक, प्रकाशक व संपादक **डोईजड ज्ञानेश्वर बालाजीराव** यांनी मुद्रक **सतिश विजय सोनवणे** यांच्या **यश प्रिंटर्स अँड पब्लिकेशन शिवाजी नगर नांदेड ता.जि. नांदेड (महाराष्ट्र) – ४३१६०२** येथे प्रकाशित केले.
E-MAIL - shramiklokrajya@gmail.com

**Daily Shramik Lokrajya,** Owner, Publisher & Editor **DOIJAD DNYANESHWAR BALAJIRAO,** Printer **SATISH VIJAY SONWANE**. Printed at **YASH PRINTERS & PUBLICATION HOUSE NO, 1-2-211, SHIVAJI NAGAR, NANDED**, Tq. Dist. **NANDED**, (Maharashtra) - 431602 M.S. & Published Near **AT POST. GAYATRI NAGAR, MUKHED TQ. MUKHED, DIST. NANDED-431715**
Email : shramiklokrajya@gmail.com

# संघर्षातून घडलेला आदर्श वकील

# ॲड. अंतेश्वर गोगे

## खडतर प्रवास पण संकटाला जिद्दीने सामोरे जाणारा लढवय्या..!

**वाढदिवस विशेष लेख**



**जीवनाच्या प्रवासात प्रत्येक माणसाला अनेक अडचणींचा सामना करावा लागतो. काहीजण या अडचणींना शरण जातात, तर काहीजण या अडथळ्यांना पायरी बनवून प्रगतीच्या शिखरावर पोहोचतात. मुखेड येथील ॲड. अंतेश्वर गोगे हे असेच एक व्यक्तिमत्व आहे, ज्यांनी संघर्षाशी झुंज देत केवळ आपले आयुष्य घडवले नाही तर समाजातील नव्या पिढीला प्रेरणा दिली.**

**आज, दि. ५ सप्टेंबर २०२५ रोजी त्यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांना मनःपूर्वक शुभेच्छा. त्यांचे आयुष्य आरोग्य, आनंद आणि यशाने सदैव परिपूर्ण होवो. त्यांच्या जीवनाचा संघर्षमय प्रवास हा समाजातील प्रत्येक तरुणासाठी आणि विशेषतः वकिली क्षेत्रात पदार्पण करणाऱ्यांसाठी एक प्रेरणादायी दीपस्तंभ ठरेल, यात शंका नाही.**

अंतेश्वर गोगे यांचा जन्म एका साध्या, मध्यमवर्गीय कुटुंबात झाला. घरची परिस्थिती फारशी सक्षम नसतानाही त्यांनी शिक्षण घेण्याची जिद्द कायम ठेवली. शालेय जीवनातच त्यांची मेहनती वृत्ती दिसून येत होती. उच्चशिक्षणाच्या टप्प्यावर त्यांनी बी.ए. आणि बी.एड. पूर्ण केले. शिक्षकाची कारकीर्द गाठण्याची संधी असतानाही त्यांना लोकांसाठी लढण्याची, समाजातील वंचितांना न्याय मिळवून देण्याची ओढ होती. या ध्येयाने त्यांनी एल.एल.बी. करून वकिली क्षेत्रात पाऊल ठेवले.

वकिलीचा व्यवसाय हा सुरुवातीच्या काळात खडतर असतो. त्यात अनुभवाची कमी, ग्राहकांचा विश्वास जिंकण्याची धडपड, न्यायालयीन तांत्रिक गुंतागुंत या सगळ्यांचा सामना करावा लागतो. गोगे यांनी मात्र या सगळ्या अडचणींना जिद्दीने तोंड दिले. दिवस-रात्र अभ्यास, सीनिअर वकिलांकडून घेतलेले मार्गदर्शन, आणि सतत स्वतःला सिद्ध करण्याची धडपड यामुळे त्यांनी आपले स्वतंत्र स्थान निर्माण केले. केवळ दोन वर्षांच्या कालावधीत त्यांच्यावर इतका विश्वास बसला की त्यांची निवड मुखेड अभिवक्ता संघाचे कोषाध्यक्ष म्हणून झाली. हा सन्मान त्यांच्या प्रामाणिकपणाचे, कार्यतत्परतेचे आणि सहकाऱ्यांच्या विश्वासाचे द्योतक आहे. एवढ्या कमी वयात मिळवलेली ही जबाबदारी त्यांच्या कारकिर्दीतील एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरला.

वकिलीच्या कारकिर्दीत त्यांनी अनेक प्रकरणे हाताळली आणि त्यात यश संपादन केले. परंतु, हे यश त्यांच्या डोक्यात गेले नाही. प्रत्येक प्रकरणात तेवढ्याच निष्ठेने आणि प्रामाणिकपणे लढणे, यशाचा गर्व न करता सातत्याने शिकत राहणे ही त्यांची खासियत आहे. न्यायालयीन कामकाजात ते नेहमी शांत, संयमी आणि मुद्देसूद पद्धतीने मांडणी करतात. त्यामुळेच त्यांना नागरिकांचा विश्वास लाभला आहे.

मात्र, त्यांच्या जीवनात एक कठीण वळण आले. आरोग्याची साथ सोडली आणि डायलिसीस सारख्या कठीण उपचारपद्धतीला सामोरे जावे लागले. हा टप्पा कोणत्याही माणसाला खचवणारा ठरतो, पण गोगे यांनी आरोग्याच्या अडथळ्यांनाही कधी हार मानली नाही. आठवड्यातून वारंवार उपचार करूनही ते न्यायालयात हजेरी लावतात, क्लायंटच्या समस्या ऐकतात आणि आपल्या जबाबदाऱ्या पार पाडतात. आरोग्याची झुंज सुरू असतानाही त्यांच्या चेहऱ्यावर नेहमी एक स्मित हास्य दिसते. त्यांच्या या वृत्तीमुळेच अनेकांना जीवनाकडे सकारात्मक नजरेने पाहण्याची प्रेरणा मिळते. त्यांच्या प्रवासात कुटुंबाचा मोठा आधार आहे. आई-वडिलांचे आशीर्वाद आणि भावाचे साथ हे त्यांच्या आयुष्याचे बळ आहे. या कौटुंबिक पाठबळामुळेच ते आरोग्याशी झगडत असूनही धैर्याने जगू शकतात. आज मुखेड दिवाणी न्यायालयात काम करणारे ॲड. गोगे हे केवळ यशस्वी वकील नाहीत, तर एक आदर्श माणूस आहेत. त्यांचा स्वभाव सौम्य आहे. न्यायालयीन लढाईत तेवढेच कठोर आणि ठाम असले तरी सहकाऱ्यांशी, नागरिकांशी बोलताना ते नेहमी सौजन्य राखतात. त्यांनी कधीही कोणाचे मन दुखावले नाही, ही त्यांची मोठी जमेची बाजू आहे. त्यांच्या प्रवासात एक संदेश दडलेला आहे – “संघर्ष हा जीवनाचा अविभाज्य भाग आहे. पण संघर्षाला घाबरून न जाता त्याला धैर्याने सामोरे गेल्यास यश आपोआप मिळते.” अंतेश्वर गोगे यांचे आयुष्य या वाक्याचे उत्तम उदाहरण आहे.

**वकिली व्यवसायाबरोबरच ॲड. अंतेश्वर गोगे हे समाजकार्यातही तितक्याच उत्साहाने सहभागी होत असतात. न्यायालयीन कामकाजात व्यस्त वेळापत्रक असूनही समाजातील प्रश्न सोडविण्यासाठी ते नेहमी पुढाकार घेतात. गावोगावी, परिसरात उद्भवणाऱ्या समस्या समजून घेऊन त्यावर उपाययोजना करण्यासाठी ते स्थानिक लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी यांच्याशी सातत्याने संपर्क साधतात. आरोग्याची लढाई देत असतानाही समाजकार्यातील त्यांचा सहभाग कमी झालेला नाही. गरजूंना न्याय मिळवून देण्याबरोबरच समाजातील दुर्बल घटकांना मदतीचा हात देणे, ही त्यांची कार्यशैली आहे.समाजकार्यातील त्यांचा हा सक्रिय सहभाग पाहता एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते – “व्यवसाय आणि समाजकार्यात समतोल राखत स्वतःचे अस्तित्व सिद्ध करता येते.” ॲड. अंतेश्वर गोगे यांचे हे काम अनेकांसाठी प्रेरणादायी ठरले आहे.**

### ॲड. अंतेश्वर बसवराज गोगे : जीवनपट

जन्म दिनांक : 5 सप्टेंबर 1989

छंद / आवड : वाचन, तसेच इतरांच्या हाकेला तत्काळ धावून जाऊन कुठल्याही परिस्थितीत मदतीला धावून जाणे हेच त्यांच्या नेतृत्वाचे वैशिष्ट्य मानले जाते.

शिक्षण : प्राथमिक शिक्षण 1 ली ते 5 वी गुरुदेव विद्या मंदिर, मुखेड येथे तर 6 वी ते 12 वी पर्यंतचे शिक्षण नृसिंह विद्या मंदिर, उमरधरी (मुखेड) येथे झाले. लहानपणापासूनच शिक्षणाची आवड व अभ्यासाविषयी ओढ दिसून आली.

व्यक्तिमत्त्व : ॲड. अंतेश्वर गोगे यांचा मोठा मित्रपरिवार आहे. सामाजिक जाणीव, नेतृत्वगुण आणि मदतीस तत्परता ही त्यांची ओळख आहे. समाजातील सर्व स्तरातील लोकांशी जिव्हाळ्याचे संबंध ठेवत कार्य करणारे व्यक्तिमत्त्व म्हणून ते परिचित आहेत.




### “समय से पहले और भाग्य से अधिक किसी को कुछ नही मिलता” – ॲड. अंतेश्वर गोगे यांचे ब्रीदवाक्य



प्रत्येक यशस्वी व्यक्तिमत्वामागे एक तत्त्वज्ञान, एक विचारधारा दडलेली असते. ऍड. अंतेश्वर गोगे यांच्या आयुष्याचा पाया म्हणजे त्यांचे ब्रीदवाक्य – “समय से पहले और भाग्य से अधिक किसी को कुछ नही मिलता.”या एका वाक्यात त्यांच्या संपूर्ण जीवनप्रवासाचा सार सामावलेला आहे.

डायलिसीससारख्या आजाराशी झगडताना देखील त्यांनी या विचारधारेचा आधार घेतला. “योग्य वेळ येईल, त्या क्षणी माझ्या मेहनतीचे चीज होईल,” या आत्मविश्वासाने ते कार्यरत



राहिले. वकिली व्यवसायात अल्पावधीत मिळवलेले यश, समाजकार्यातील सक्रियता, आणि लोकांचा मिळवलेला विश्वास – हे सगळे त्यांच्या या ब्रीदवाक्याचेच फळ आहे. आज त्यांच्या जीवनाकडे पाहिले तर जाणवते की नशीब हे मेहनतीसमोर दुय्यम ठरते. योग्य वेळ येईपर्यंत सातत्याने प्रयत्न करत राहणे हाच खरा मार्ग आहे. अंतेश्वर गोगे यांनी आपल्या आयुष्याने हे ब्रीदवाक्य जणू प्रत्यक्षात उतरवले आहे. त्यामुळेच त्यांचे हे वचन केवळ त्यांचेच नव्हे, तर अनेक तरुणांसाठी प्रेरणादायी मंत्र ठरले आहे.

**संकलन - ज्ञानेश्वर डोईजड**
**संपादक, दैनिक श्रमिक लोकराज्य, 7875782377**